**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मासैनो-२०१९/ प्र. क्र. २००/२८**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: १७.०७.२०१९.

<u>वाचा</u>

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मासैनो २००५/६२२/प्र.क्र.११९/२८, दिनांक ११ जून, २०१०
२) महाव्यवस्थापक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे यांचे पत्र क्रमांक मेस्को/ शासन/ सामान्य, दिनांक २७ मे, २०१९.

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र राज्यातील सैन्यदलातील (भूदल, नौदल,वायुदल) निवृत्त होणाऱ्या माजी सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे म्हणून तसेच विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाच्या ठळक उद्दिष्टांपैकी माजी सैनिकांना सरकारी, निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरण व खाजगी संस्थांमध्ये सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करुन देणे हे एक उद्दिष्ट आहे. माजी सैनिकांबरोबरच त्यांच्या कुटुंबियांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने युध्द विधवांची मुले, युध्द विधवा, युध्दात अपंग झालेले सैनिक, इतर अपंग सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा,माजी सैनिकांचे पाल्य,इत्यादीना सुध्दा रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या मेमोरँन्डम ऑफ असोसिएशनमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

महामंडळाच्या सर्व व्यावसायिक उपक्रमांमध्ये माजी सैनिकांच्या पाल्यांना रोजगार पुरवितांना त्यांचे पाल्य कोणास मानावे या विषयी बरीच संदिग्धता निदर्शनास आली . यास्तव माजी सैनिकांच्या पाल्यांची पात्रता ठरविण्यासाठी त्यांचे मापदंड निश्चित करणे शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>**शासन निर्णय**</u>

मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या मान्यतेने माजी सैनिकांच्या अवलंबितांसाठी खालीप्रमाणे पात्रता निश्चित करण्यात येत आहे.

१) माजी सैनिकांचा मुलगा ज्याचे वय भरतीच्या वेळी ३५ वर्षापर्यंत आहे. आणि त्याचा तपशील डिसचार्ज बुक मध्ये नमूद केलेला आहे. तसेच तो त्या माजी सैनिकावर अवलंबून असला पाहिजे.
२) माजी सैनिकांची अविवाहीत मुलगी, जिचे लग्न झालेले नाही व भरतीच्या वेळी ३५ वर्ष वया खालील असेल, त्याचा उल्लेख डिसचार्ज बुक मध्ये केलेला असावा, तसेच ती त्या माजी सैनिकावर अवलंबून असली पाहिजे.

३) मुलगा अथवा मुलीचा पार्ट दोन ऑर्डर चा उल्लेख डिसचार्ज बुक मध्ये नसल्यास पर्यायी कागदपत्रांचे निरिक्षण करुन जसे की आधार कार्ड, राशन कार्ड, व्होटर कार्ड, इत्यादी नुसार पात्रता ठरविण्यात यावी.

४) माजी सैनिकांच्या विधवा/विवाहीत /घटस्फोटीत मुलींना पाल्य मानले जाणार नाही.

५) माजी सैनिकांच्या पत्नीस व विधवेस नोकरीस पात्र मानले जाईल.

६) माजी सैनिकाने दत्तक घेतलेल्या मुलास अथवा मुलीस वरील १,२,३, व ४ मधील मापदंड अनुसार पाल्य मानले जाईल. अशा मुलांना/मुलींना दत्तक घेतल्याचे कायदेशीर दस्ताऐवज सादर करणे आवश्यक आहे.

२. एका ठिकाणी माजी सैनिकाच्या एकाच पाल्याला महामंडळाद्वारे नोकरी देण्यात येईल. त्या माजी सैनिकांचे इतर पाल्य असल्यास त्यांना दुसऱ्या जिल्हयात जागा उपलब्ध असतील तर महामंडळाद्वारे नोकरी देण्यात येइल  वरील पात्रते प्रमाणे महामंडळाच्या सर्व व्यावसायिक उपक्रमांमध्ये सामाविष्ठ करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. पुणे  यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२२१६०२१०११०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh Mahadeo Khade

Digitally signed by Suresh Mahadeo Khade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=14c299447f4a6e6c33ab3f7a85fbf010628981e82f8311a81d1cf974681485c2, serialNumber=f0b4c833a6fc7c6fb7cb0a96a3e2bb79d42d283b8f0f7bfc1ae95298d60bacf1, cn=Suresh Mahadeo Khade
Date: 2019.07.22 16:07:33 +05'30'

**( सुरेश खाडे )**

उप सचिव महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा. मंत्री. (माजी सैनिक कल्याणप) यांचे खाजगी सचिव,

४. मा. राज्यमंत्री (माजी सैनिक कल्याण) यांचे खाजगी सचिव,

५. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ, रायगड, इमारत राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर, सोलापूर रोड, घोरपडी, पुणे ४११००१,

६. संचालक, सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, रायगड इमारत, राष्ट्रीय स्मारकासमोर, सोलापूर रोड, घोरपडी, पुणे ४११इ ००१,

७. सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,

८. निवड नस्ती.

**महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी माजी सैनिक महामंडळाची (Mesco) स्थापना**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक:मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ जानेवारी, २००२.

**शासन निर्णय :-**

सैन्यदलातील (भूदल, नौदल व वायुदल) निवृत्त होणाऱ्या सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता विविध कल्याणकारी योजना राज्य आणि केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सेवानिवृत्त, अपंग सैनिक किंवा युध्दात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, याकरिता देखील काही योजना आखण्यात आलेल्या आहेत. या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कल्याणाकरिता एक महामंडळ स्थापन करावे, असा विचार १९८२ पासून शासनाच्या विचाराधीन होता. अलिकडेच कारगिल विजय स्मृतीदिनानिमित्त दि.२८ जुलै, २००१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मा.मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी राज्यात अशा महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी माजी सैनिक महामंडळाची (Maharashtra Ex-serviceman's Corporation ) स्थापन करण्याचा शासनाने आता निर्णय घेतला आहे.

२. या माजी सैनिक महामंडळाची ठळक उद्दीष्टे खालीलप्रमाणे असतील.

१) माजी सैनिकांना सरकारी, निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरण व खाजगी विभागामध्ये सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करून देणे. त्यासाठी महामंडळाच्या मेमोरेन्डम ऑफ असोसिएशनमध्ये या कलमाचा अंतर्भाव करणे.

२) माजी सैनिकांसाठी स्वयंरोजगाराच्या योजना आखणे, तयार करणे, त्यासाठी आर्थिक मदत मिळवून देणे तसेच उद्योग धंदा सुरू करणे, व्यापार, वाणिज्यिक व सेवा उद्योगाची स्थापना करणे, त्यांचे प्रचलन करणे, इत्यादीबाबत माजी सैनिकांना मार्गदर्शन व मदत करणे.

शा.नि. १०५

३) माजी सैनिकांच्या रोजगार आणि पुनःस्थापना योजना सुरु करणे,त्यांचे प्रचलन करणे प्रायोजन करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे.

४) माजी सैनिकांचे कल्याण आणि पुनःस्थापना करण्याच्या दृष्टीने व्यवसायांची उभारणी करणे,तसेच उत्पादन खरेदी-विक्री,विनियमन,उभारणी,व्यवसायाबद्दल सुधारणा इ.उपक्रम सुरु करणे तसेच उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देणे,विविध प्रकारचे उद्योग,यंत्रसामुग्री,निखळ सामग्री आणि उपकरणे,कच्चा माल इत्यादी भाडेतत्वावर मिळवून देणे, त्याबाबत सहाय्य करणे.

५) माजी सैनिकांची आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने विविध योजना आखणे व त्या कार्यान्वीत करणे.

६) माजी सैनिकांसाठी स्थापन करण्यात येणारे सदर महामंडळ मेस्को (MESCO) सैनिक कल्याण विभागाच्या यंत्रणेव्यतिरिक्त स्वतंत्रपणे परंतु सैनिककल्याण विभागाच्या यंत्रणेशी समन्वय राखून काम करील.

३. सदर महामंडळ निर्माण झाल्यावर हे तूर्त तरी अतिशय छोटया आकाराचे असेल. सदर महामंडळाचे मुख्यालय पुणे येथे राहील. या महामंडळाच्या संचालकाचे काम संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे हे अतिरिक्त कार्यभार म्हणून पहातील. त्याशिवाय एक व्यवस्थापक, एक अधीक्षक व एक कार्यकारी सहायक एवढा अधिकारी/कर्मचारी वृंद राहील.

४. सदर महामंडळ आर्थिक दृष्टया सक्षम व स्वंयपूर्ण व्हावे म्हणून सुमारे ५ कोटी रूपये इतके भागभांडवल उपलब्ध करून देण्यात यावे असा निर्णयही शासनाने घेतला आहे. या भागभांडवलापैकी जवान कल्याण विश्वस्त मंडळ (महाराष्ट्र) ह्या संस्थेकडे जमा असलेले रु.४ कोटी ५३ लाख माजी सैनिक महामंडळाच्या भागभांडवलासाठी उपलब्ध करून देण्यात यावे. तसेच रू.५ लाख हे यावर्षीच्या अर्थसंकल्पात विधिमंडळास पूरक मागणी सादर करून शासकीय अनुदानातून उपलब्ध करून देण्यात यावे आणि उर्वरित भागभांडवल हे माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी प्रतिवर्षी जनतेकडून संकलीत करण्यात येणाऱ्या ध्वजदिन निधीअंतर्गत जमा होत असलेल्या कल्याणकारी निधीतून अर्थसहाय्याच्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात यावे असा तत्वतः निर्णय घेण्यात आलेला असून त्यासंबंधीत आवश्यक ती पुढील कार्यवाही पूर्ण झाल्यावर जरूर ते आदेश निर्गमित केले जातील यासाठी विहित मार्गाने तरतूद करण्यात येईल आणि तरतूद झाल्याशिवाय यासाठी खर्च करता येणार नाही.

५. तसेच हे महामंडळ निर्माण झाल्यावर महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियम व

कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम २३ अ अनुसार या महामंडळास अधिनियमातून सूट देण्याची कार्यवाही उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून व्हावी असाही तत्वत: निर्णय शासनाने घेतला आहे. त्याचबरोबर महासंचालक, पुनर्वसन संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून या महामंडळामार्फत सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्ट चालविण्यासाठी मान्यता प्राप्त करून त्यांच्या सूचना व नियमानुसार राज्यातील विविध शासकीय / निमशासकीय व खाजगी संस्थांशी करार करून त्यांना लागणारे सुरक्षा कर्मचारी पुरविण्यात यावेत असाही निर्णय घेण्यात आलेला आहे.

६. वरीलप्रमाणे उद्दीष्टे असलेल्या हया महामंडळाची नोंदणी कंपनी अधिनियम १९५६ अनुसार कंपनी म्हणून करण्यात यावयाची आहे. वरील परिच्छेदांमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे कार्यवाही पूर्ण होताच प्रस्तुत महामंडळाच्या स्थापनेबाबतचे सविस्तर आदेश काढण्यात येतील.

७. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३७/२००२/व्यय - ४, दि.१७.१.२००२ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. व. दिवाण)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति -

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा/मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

संचालक, सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, सिडको, ए-१, १२, सेक्टर ३, मौलाना आझाद कॉलेजच्यामागे, नविन औरंगाबाद - ४३१ ००३,
सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जिल्हा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,
माहिती व जनसंपर्क महासंचालक (प्रसिध्दी पत्रक काढण्याच्या विनंतीसह),
मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागाध्यक्ष आणि कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती ( २ प्रती).
* पत्राने.

महाराष्ट्र राज्यातील माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यासाठी राज्यात स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळास सुरक्षा रक्षकपुरविण्याची कामे प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १४ नोव्हेंबर, २००२.

वाचा :- शासन निर्णय, क्रमांक:मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४(९९)२८, दिनांक १८/१/२००२

शासन निर्णय :-

सैन्यदलातील (भूदल, नौदल व वायुदल) निवृत्त होणा-या सैनिकांचे पुनर्वसन व्हावे आणि त्यांना निवृत्तीनंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात याकरिता विविध कल्याणकारी योजना राज्य आणि केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आल्या आहेत. अशा सेवानिवृत्त, अपंग सैनिक किंवा युध्दात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या कुटुंबियांना उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, याकरिता देखील काही योजना आखण्यात आलेल्या आहेत. या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारकपणे करण्याकरिता माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी आणि कल्याणाकरिता शासन निर्णय, क्रमांक:मासैम-१०९९/२३९०/प्र.क्र.२४४/९९/२८,दिनांक १८/१/२००२ अन्वये महाराष्ट्रात माजी सैनिकांचे पुनर्वसन व अन्य कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाची (Maharashtra Ex-serviceman's Corporation ) स्थापना करण्यात आली आहे.

२. या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाच्या उद्दीष्टांमध्ये नमूद केल्या प्रमाणे माजी सैनिक सरकारी / निमसरकारी, शासकीय महामंडळे व प्राधिकरणे व खाजगी क्षेत्रातील सुरक्षा क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध करुन देण्यासाठी महामंडळाच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशनमध्ये या स्वरुपाच्या कलमाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने आता शासनाने असा निर्णय घेतला आहे की, सरकारी क्षेत्र / उपक्रम, शासकीय मंडळे, महामंडळे / महानगर पालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/ स्वायत्त संस्था / सहकारी संस्था/ शासकीय कार्यालये यांना ज्या ज्या वेळी सुरक्षा अधिकारी / कर्मचारी लागतील तेव्हा त्यांनी खाजगी अभिकरणामधून सुरक्षा रक्षक न मागविता शासनाने स्थापन केलेल्या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळातील माजी सैनिकामधूनच सुरक्षा रक्षक मागवावेत.तसेच महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ हे राज्य शासनाने

स्थापन केलेले मान्यता प्राप्त महामंडळ असल्याने सदर महामंडळाकडून सुरक्षा रक्षक मागवितांना निविदा पध्दतीचा अवलंब करण्याची आवश्यकता नाही.

३. या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळाला बृहन्मुंबई व ठाणे या परिसरात सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम २३ अनुसार सूट देण्याबाबत स्वतंत्र रित्या कार्यवाही करण्यात येत असून, त्याबाबत स्वतंत्र आदेश यथावकाश काढण्यात येतील.तो पर्यंत वरील परिच्छेद २ मधील निर्णय बृहन्मुंबई व ठाणे परिसरास लागू होणार नाही.

४. महासंचालक, पुनर्वास, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी या महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत सुरक्षा रक्षकाचे कंत्राट (कॉन्ट्रक्ट) चालविण्यासाठी मान्यता दिली असून त्यांच्या अधीन राहून, **तसेच सदर महासंचालक , पुनर्वास, यांनी सुरक्षा रक्षकांसाठी वेळोवेळी निर्धारित केलेल्या सुधारित वेतनश्रेणी आणि त्यांच्या तद्संबंधीच्या अटीनुसार** राज्यातील (बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा वगळून) इतर विविध शासकीय / निमशासकीय व खाजगी सेवांशी आवश्यक ते करार करुन त्यांना लागणारे सुरक्षा कर्मचारी महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळामार्फत पुरविण्यात यावेत.

हा शासन निर्णय उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३१०८, दि.११.१०.२००२ तसेच वित्त विभाग यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१०३९/२००२/व्यय-४, दि.३१.१०.२००२ यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स्वाक्षरी)

**ज. व. दिवाण**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,
मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व महानगर पालिका आयुक्त/ सर्व मुख्य अधिकारी, नगरपरिषदा,
अध्यक्ष,नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर
महानगर आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण,मुंबई ,
मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी [illegible] चवड प्राधिकरण,पिंपरी-चिंचवड,पुणे,
व्यवस्थापकीय संचालक,मह[illegible] र औद्योगिक विकास महामंडळ,दुसरा मजला,निर्मल
बिल्डींग,नरीमन पॉ[illegible]

# DIRECTORATE GENERAL RESETTLEMENT

2830

GOVERNMENT OF INDIA, MINISTRY OF DEFENCE, WEST BLOCK IV,
RK PURAM, NEW DELHI - 110066

## Empanelment Certificate – State ESM Corporation
## (Valid with DGR Sponsorship only)

1. This is to certify that **2830/ M/s MAHARASHTRA EX-SERVICEMEN CORPORATION LTD (MESCO), PUNE** is empanelled with the Directorate General Resettlement, Government of India, Ministry of Defence, vide Empanelment number **2830** with effect from **22 Nov 2023 to 21 Nov 2028.**

2. The details of the ESM Corporation are as follows:-

| Correspondence Address | **"RAIGAD", 2ND FLOOR, OPP. NATIONAL WAR MEMORIAL, GHORPADI, PUNE-411 001** | | |
|---|---|---|---|
| E-mail Id | Telephone No. | Tele Fax No. | Mob No. |
| **contact@mescoltd.co.in** | **020-71002618** | **020- 26331900** | **09420697802** |

3. The above mentioned ESM Corporation is authorized to operate and provide security services within the state of **MAHARASHTRA & PAN INDIA (less States having own ESM Corporation *empanelled with DGR*)**.

4 The validity of this certificate is from **22 Nov 2023 to 21 Nov 2028** or when made Non-Operational by DGR as reflected on DGR website. The validity of Empanelment will be renewed after 05 years.

5 The above mentioned ESM Corporation is exempted from all the provisions of the Private Security Agencies (Regulations) Act, 2005 under the provisions of Para 2(g) of the said Act being a Government body. The above mentioned ESM Corporation shall adhere to all provisions and any other rules/acts and regulations issued by or on behalf of Central and State Government. The above mentioned State ESM Corporation shall provide Certificate of Compliance towards both training and social security aspects, for all employees as contracted by them for provision of security services. The certificate shall be forwarded by State ESM Corporation to DGR by 30th Jun every year.

6. The above mentioned ESM Corporation shall adhere to all the provisions of Dept of Ex-servicemen Welfare, Ministry of Defence OM No. 28(75)/2020-D(Res-1) dated 13 May 2021, along with Corrigendum issued on 23 Jun 2021.

Signature of proprietor

Date : 22 NOV 23
Seal of Directorate General Resettlement

ले. कर्नल नवल शर्मा / Lt Col Naval Sharma
संयुक्त निदेशक (रोजगार) / Jt Director (Emp)
पुनर्वास महानिदेशालय / Dte Gen Resettlement
रक्षा मंत्रालय, नई दिल्ली-110066
Ministry of Defence, New Delhi-110066

Signature of representative of Directorate General of Resettlement

अतुल दीवान / Atul Dewan
कमोडोर / Commodore
प्रधान निदेशक (रोजगार) / PD (Emp)
पुनर्वास महानिदेशालय / Dte Gen Resettlement
रक्षा मंत्रालय / Ministry of Defence
नई दिल्ली–110066 / New Delhi-110066

Signature of representative of Directorate General of Resettlement

SEE INSTRUCTIONS OVERLEAF